# प्रेस नोट दि ०१/१०/१८

## हडपसर पोलीस स्टेशन

हडपसर पोलिस ठाण्यास नेमणुकीस असलेले पो शि/१००४० प्रविण ओंकार डोणे व पो शि १००६५/श्याम पांडुरंग वेदले यांना दि ०१/१०/१८ रोजी हडपसर पोलिस ठाणे हद्दीतील मगरपट्टा बीट मार्शल कर्तव्यास असताना मुख्य नियंत्रण कक्षाकडुन ११/०५ वा कॉल प्राप्त झाला की,गोसावी वस्ती वैदवाडी येथे मोकळ्या मैदानाजवळ एक ४ वर्ष वयाची मुलगी मिळुन आली आहे त्याप्रमाणे नुसार नमुद मगरपट्टा बीट मार्शल गोसावी वस्ती वैदवाडी येथे मोकळ्या मैदानाजवळ गेले असता तेथे त्यांना मुख्य नियंत्रण कक्षास कॉल केलेल्या महिला नामे श्री इंदुबाई मालेकर या भेटल्या त्यांनी एक चार वर्षाची मुलगी रडताना गोसावी वस्ती चे मोकळे मैदानात भेटली आहे म्हणुन १०० नंबरला कॉल केला असे त्यांनी सांगितले

सदर मुलीला मगरपट्टा बीट मार्शल यांनी ताब्यात घेतले व आजुबाजुस वाढील तसेच परिसरामध्ये तिचे नातेवाईकांचा शोध घेण्यास सुरुवात केली परंतु सदर मुलीचे नातेवाईकांबाबत माहिती मिळाली नाही त्यानंतर बीट मार्शल हे सदर मुलीचे नातेवाईकांचा शोध घेत असताना साधारण चार तासानंतर वैदवाडी तिरंगा एचपी पेट्रोल पंपावर आले असता एचपी पेट्रोल पंपावर सदर लहान मुलीचे वडिल नामे रफिक अहमद शेख हे काम करत असलेबाबत माहिती मिळाली व तिचे आई वडिल सदर मुलीचा सकाळ पासुन शोध घेत असले बाबत सांगितले त्यानंतर सदर मुलीचे आई वडिलासोबत बीट मार्शल यांनी संपर्क केला व सदर मुलीला तिचे वडिलांचे ताब्यात दिले तेव्हा सदर मुलीचे नाव पत्ता रफिक शेख वय ४ वर्ष वडिलांचे नाव रफिक अहमद शेख वय ४० वर्ष धंदा नोकरी एचपी पेट्रोलपंपावर रा शिंदे चाळ,वैदवाडी हडपसर पुणे मो ७२६४००८१९० असल्याचे समजले सदर मुलीला सुरक्षित रित्या व सुखरुप व कमी वेळात तिचे आई वडिलांचे ताब्यात मगरपट्टा बीट मार्शल यांनी पोहचविले सदर उल्लेखनीय कामगीरीबद्दल बीट मार्शल पो शिपाई प्रवीन डोणे व श्याम वेदले यांना मा पोलिस उपायुक्त सो परिमंडळ ५ यांचे कडुन बक्षिस देऊन गौरविण्यात आले आहे